दै. पुण्य नगरी

# जबरी चोरी व मोबाईल स्नॅचिंग करणारी टोळी जेरबंद

## चोरीच्या ३ दुचाकी, १ लॅपटॉप व ८ मोबाईल असा साडेतीन लाखांचा ऐवज जप्त



**नांदेड/प्रतिनिधी**

वजिराबाद पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने ५ डिसेंबर रोजी पहाटे २ संशयीतांना दुचाकीवरुन जाताना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळ असलेली दुचाकी चोरीची असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांना पोलिसी खाक्या दाखविला. त्यानंतर त्यांचा इतर गुन्ह्यात सहभागी असल्याची गंभीर बाब समोर आली. त्यांच्याकडून ३ लाख २२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या टोळीत एक विधी संघर्ष बालक असल्याची बाब उघड झाली.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपअधीक्षक चंद्रसेन देशमुख यांनी नांदेड शहरातील गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी सक्रीय गुन्हेगारांची तपासणी करणे, पोलीस ठाण्याच्या हद्दीत लावण्यात आलेले क्युआर कोड स्कॅनिंग करीत शहरात सतत पेट्रोलींग चालु ठेवणे, रात्री -अपरात्री फिरणाऱ्यांना अटकाव करुन त्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या होत्या. या अनुषंगाने ५ डिसेंबर रोजी गुन्हे शोध पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, पो.हे.कॉ. दत्तराम जाधव, पो.ना. शरदचंद्र चावरे, गजानन किडे, मनोज परदेशी, संतोष बेलुरोड, व्यंकट गंगुलवार, शेख ईम्रान शेख एजाज, बालाजी कदम, रमेश सूर्यवंशी यांचे पथक वजिराबाद ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक रेल्वेस्टेशन रोड या ठिकाणी अभिलेखावरील गुन्हेगार शेख सलमान शेख निसार (रा. तेहरानगर नांदेड) व शेख अशफाक शेख रज्जाक (रा. नुरी चौक नांदेड) हे अस्पष्ट नंबर असलेल्या दुचाकीवर आढळुन आले. त्यांना दुचाकीच्या मालकी हक्काबाबत विचारणा केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. त्यांना पोलिसी खाक्या दाखविताच त्यांनी ही दुचाकी पार्डी ता. लोहा येथुन चोरी केल्याची कबुली दिली. त्यांना पोलीस ठाण्यात आणुन अधिक चौकशी केली असता शेख सलमान शेख निसार याने दोन दिवसापूर्वी बिलोली तालुक्यातील नरसी येथून एक मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. या प्रकरणी लोहा व रामतीर्थ पोलीस ठाण्यात मोटारसायकल चोरीचे गुन्हे दाखल असल्याची खात्री झाली.



हे आरोपी अभिलेखावरील सक्रीय गुन्हेगार असल्याची खात्री पटल्याने त्यांची सखोल चौकशी करण्यात आली. आरोपी शेख सलमान शेख निसार याने त्याचे साथीदार आरोपी शेख शाहेद शेख इब्राहीम व तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या मदतीने अंदाजे १५ ते २० दिवसापूर्वी राजकॉर्नर या ठिकाणी रात्री ३ ते ३.३० वाजताचे सुमारास एक व्यक्ती रेल्वेस्टेशनहून घरी जात असतांना त्यास अडविले. मारहाण करुन, खंजरचा धाक दाखवून त्याच्याकडील लॅपटॉप व मोबाईल जबरदस्तीने पळविल्याचे सांगितले. त्याबाबत पोलीस ठाणे भाग्यनगर येथे गु.र.नं. ४२/२२ कलम ३९१,३४ भारतीय दंड विधान सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची खात्री झाली.

सर्व आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडुन चोरीच्या २ मोटरसायकली, गुन्ह्यात वापरलेली १ मोटरसायकल, चोरी केलेला लॅपटॉप व मालकी हक्क नसलेले ८ मोबाईल असा एकुण ३ लाख २२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या कार्यवाहीमुळे वरीष्ठांनी वजिराबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व गुन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले आहे.